# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०१.
# पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती (MSS) परीक्षा मार्च २०१५
## विषय योजना व घटकनिहाय गुणविभागणी कच्चा आराखडा

### ● प्रसिद्धीपत्रक ●

मार्च २०१५ मध्ये घेण्यात येणाच्या पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा, शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आणि विमुक्त जाती-भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा या सर्व परीक्षा चालू शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये अंमलात आलेल्या इ. ४ थी च्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या नवीन अभ्यासक्रमावर (प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२) आधारित घेण्यात येतील.

परीक्षा परिषदेने या नवीन अभ्यासक्रमावर आधारित विषय योजना, घटकनिहाय गुणविभागणीचा कच्चा आराखडा तयार केला असून हे प्रसिद्धीपत्रक, कच्चा आराखडा, त्यावर आधारित प्रश्नपत्रिकेचा नमुना उत्तरसूचीसह परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

आराखड्याच्या ठळक बाबी, पुढे नमूद केल्या असून या परीक्षेबाबत स्वारस्य असलेल्या व्यक्ती, शाळा, परीक्षेस मार्गदर्शन करणारे शिक्षक, संबंधित विषयातील तज्ज्ञ यांचेकडून या कच्च्या आराखड्यात सुधारणा व आक्षेप मागविण्यात येत आहेत.

### ● ठळक बाबी ●

१) नवीन अभ्यासक्रमात सामान्य विज्ञान, इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र हे विषय परिसर अभ्यास १ आणि परिसर अभ्यास २ मध्ये एकत्रित असल्याने शिष्यवृत्ती परीक्षेच्या पेपर क्र.२ मध्ये गणितासह परिसर अभ्यास-१ अंतर्भूत करण्यात आला आहे.

२) पेपर क्र.२ मध्ये बुद्धिमत्ता चाचणीसह परिसर अभ्यास २ अंतर्भूत करण्यात आला आहे.

३) मराठी माध्यमासह उर्दू, हिंदी, गुजराती, तेलुगु, सिंधी व कन्नड या सात माध्यमांचे पेपर क्र.१ चे विषयनिहाय गुणनियोजन एकसारखे (समान) असेल. इंग्रजी माध्यमाचे गुणनियोजन स्वतंत्रपणे देण्यात आले आहे.

४) मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, इंग्रजी, तेलुगु, सिंधी व कन्नड या आठही माध्यमाचे पेपर क्र.२ व ३ चे विषयनिहाय गुणनियोजन एकसारखे (समान) असेल.

५) मराठी व इंग्रजी माध्यमाचे पेपर क्र १,२,३ चे क्षेत्रनिहाय व घटकनिहाय गुण नियोजन (महत्त्वांश), अभ्यासक्रमातील बदल, नमुना प्रश्नपत्रिका व उत्तरसूची यांचे कच्चे आराखडे स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात आले आहेत

६) मराठी माध्यमाप्रमाणेच उर्वरित सहा माध्यमांचे (इंग्रजी माध्यम वगळून)म्हणजे उर्दू, हिंदी, गुजराती, तेलुगु, सिंधी व कन्नड या माध्यमांचे क्षेत्रनिहाय व घटकनिहाय महत्त्वांश (गुणविभागणी) प्रश्नपत्रिकेचा नमुना व उत्तरसूची असेल. त्यामुळे या उर्वरित सहा माध्यमांचे क्षेत्रनिहाय व घटकनिहाय महत्त्वांश, प्रश्नपत्रिकेचा नमुना व उत्तर सूची संकेतस्थळावर स्वतंत्रपणे देण्यात आलेले नाही.

**७)** सेमी इंग्रजी माध्यमासाठी स्वतंत्र विषययोजना, क्षेत्रनिहाय व घटकनिहाय महत्त्वांश असत नाही. (सेमी इंग्रजी बाबत पेपर क्र.१ साठी मूळ माध्यमाप्रमाणे विषययोजना व क्षेत्रनिहाय घटकनिहाय महत्त्वांश असतो. पेपर क्र २ व ३ साठी सर्व माध्यमांप्रमाणे विषययोजना व क्षेत्रनिहाय घटकनिहाय महत्त्वांश असतो.) त्यामुळे तो प्रसिध्द करण्यात आलेला नाही.

## ●सुधारणा / आक्षेप पाठविण्याबाबतच्या सूचना ●

१) याबाबत थेट परीक्षा परिषदेकडे लेखी निवेदन पाठवावे.

२) क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे सुधारणा / आक्षेपांचे निवेदन पाठवू नये.

३) निवेदन मुद्देसूद असावे. अनावश्यक टिपण्या किंवा उतारे, कागदपत्रे पाठवू नयेत.

४) टपालाने पाठवावयाचे निवेदन दि ३० ऑगस्ट २०१४ पर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावे.

५) निवेदन परिषदेच्या mscepune@gmail.com या 'ई' मेल आयडीवरही ३० ऑगस्ट २०१४ पर्यंत पाठवता येईल.

६) निवेदन 'मा.आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग पुणे-१' या नावे पाठवावे.

७) परिषदेस पाठविण्यात आलेल्या याबाबतच्या कोणत्याही निवेदनास वैयक्तिक उत्तर पाठविले जाणार नाही.

८) विहित मुदतीत आलेल्या सुधारणा / आक्षेपाबाबतच्या निवेदनांचा विचार करुन अंतिम आराखडा परिषदेच्या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल.

**टीप:-** माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती (HSS इ ७ वी) परीक्षा मार्च २०१५ बाबत कोणताही बदल नाही. पूर्वीच्याच आराखड्याप्रमाणे परीक्षा घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**(व्ही.बी.पायमल)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१**

**दिनांक :- १९ /०८ /२०१४**